# हिंदू महिला सभेच्या वतीने नवरात्र महोत्सवाचे आयोजन

**पुणे** : येथील हिंदू महिला सभेच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन श्री शिवाजी मंदिर येथे करण्यात आले आहे.

दि. २१ ते ३० सप्टेंबर या कालावधीत धार्मिक, सांस्कृतिक आदी कार्यक्रम होणार आहेत. घटस्थापना, देवीयाग, महालक्ष्मी पूजन, भजन, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम तर कथाकथन, गानमयी हा गीतांचा कार्यक्रम, हास्यपंचमी, कथ्थक नृत्य, अभंगवाणी हे अन्य कार्यक्रम होणार आहेत.

नवरात्र उत्सवाचे हे ६७ वे वर्ष आहे याखेरीज संस्थेच्या वतीने वर्षभर अनेकविध उपक्रम हाती घेण्यात येतात, अशी माहिती सभेच्या अध्यक्षा सुप्रिया दामले यांनी सांगितली.